00137

दिनांक :- १८/१०/२०२२

प्रति,

मा. श्री. निलेश लंके
विधानसभा सदस्य,
पारनेर - नगर मतदार संघ, पारनेर.

**विषय : शिंगवे नाईक ता. नगर येथील देवनदी वरील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा दुरुस्ती बाबत. .**

महोदय,

शिंगवे नाईक ता. नगर येथील देवनदी वरील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधकाम सन १९९२ मध्ये पुर्ण झालेले आहे. आज जवळपास ३० वर्षाचा कालावधी झालेला आहे. सदरच्या को.प. बंधा-याचे संपुर्ण काम दगडी बांधकामामध्ये झालेले आहे.

को.प.बंधारा शिंगवे नाईक हा सध्या कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग अहमदनगर यांच्या अधिपत्याखाली देखभाल व दुरुस्तीसाठी आहे. को.प.बंधारा जीर्ण अवस्थेत आहे. त्यामधून भरपूर प्रमाणात गळती सुरु असते. त्यामुळे त्याची साठवण क्षमता कमी झालेली आहे. मध्यंतरीच्या काळात मुळा पाटबंधारे विभाग अहमदनगर यांनी काही फळया नवीन बसविल्या आहेत. परंतू त्याचे चॅनेल बदलले नाहीत. संपुर्ण बंधा-याची दुरुस्ती झाली तरच बंधा-याचे आयुष्यमान वाढून आजुबाजूच्या परिसरातील शेतक-यांना त्याचा फायदा होईल. शिंगवे नाईक, इस्मालपूर या गावातील शेतक-यांची संपूर्णपणे को.प.बंधारा दुरुस्त होऊन गळती प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी आहे. तरी को.प.बंधारा दुरुस्ती बाबत संबंधीतांना निर्देश व्हावेत हि विनंती.

प्रदिप राधाकृष्ण नाईक 9423391341
(नि. उपअभियंता)

रावसाहेब गंगाराम को-हाळे
(माजी सरपंच-शिंगवे नाईक)

अनिल माणिकराव को-हाळे
(नि. सहा. प्रकल्प अधिकारी)

पोपट कोंडीराम बोरुडे
(विशेष कार्य. अधिकारी)